# महाराष्ट्र शासन

क्र. बृआमा २०१६/प्र.क्र. ४६३/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक — १८/०९/२०१७.

प्रति,

कुलगुरु/कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई.

विषय - मुंबई विद्यापीठाचा सन २०१८-१९ ते सन २०२२-२३ चा बृहत आराखडा मंजूर करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन मला आपणांस असे कळविण्याचे निदेश आहेत की, मुंबई विद्यापीठाच्या बृहत आराखड्यास महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या कार्योत्तर मंजूरीच्या अधीन राहून सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' सह मान्यता देण्यात येत आहे.

दि. ३१/०८/२०१७ रोजी झालेल्या महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या बैठकीत मुंबई विद्यापीठ वगळून अन्य अकृषी विद्यपीठांच्या बृहत आराखड्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार निर्गमित करण्यात आलेल्या दि. ०८/०९/२०१७ व दि. ११/०९/२०१७ च्या पत्रांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. उक्त पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचना मुंबई विद्यापीठासही लागू असून त्या सूचनांनुसार कृपया आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी अग्रेषित -

१) मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे प्रधान सचिव
२) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव
३) मा. मंत्री, वित्त विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव
४) मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव
५) मा. मंत्री, उद्योग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव
६) मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव

७) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव

८) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

९) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

१०) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

११) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

१२) अपर मुख्य सचिव, उद्योग विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

१३) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

१४) प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.

१५) प्रधान सचिव, नियोजन विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

१६) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

१७) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

१८) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

१९) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

२०) सह सचिव, विद्यापीठ अनुदान आयोगाचे पश्चिम क्षेत्रिय कार्यालय तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

२१) अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

२२) सह सचिव (विशि) यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

**पत्र क्र. बृआमा—२०१७/प्र.क्र. ४६३/विशि—३, दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ चे सहपत्र परिशिष्ठ 'अ'**

**मुंबई विद्यापीठ**

शैक्षणिक वर्ष २०१८—१९ या साला करिता बृहत आराखडयानुसार नविन महाविद्यालये(पदविपूर्व व पदव्युत्तर)निश्चित केलेल स्थान

| अ. क्र. | विद्याशाखा/ महाविद्यालयाचा प्रकार | मुंबई शहर | मुंबई उपनगर | ठाणे | नवी मुंबई | पालघर | रायगड | रत्नागिरी | सिंधुदूर्ग | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमांचे महाविद्यालय (पदवीपूर्व) | —— | ०१ (दहिसर—पूर्व) | ०१ (मीरा भाईंदर) | —— | —— | —— | ०४<br>१. रत्नागिरी शहर<br>२. मिरझोळे, ता. रत्नागिरी<br>३. पडवे, ता. राजापूर<br>४. कांगणेवाडी, चिपळूण शहर | ०१ (शिरगांव, ता. देवगड) | ०७ |
| २ | विधी महाविद्यालय (पदवीपूर्व) | —— | —— | —— | —— | —— | ०१ (ता. कर्जत) | —— | —— | ०१ |
| ३ | महिला महाविद्यालये (कला , वाणिज्य, विज्ञान) (पदवीपूर्व) | —— | —— | ०१ (भिवंडी) | —— | —— | —— | —— | —— | ०१ |
| ४ | विधी महाविद्यालय | —— | —— | ०१ (मीरा भाईंदर) | —— | —— | —— | —— | —— | ०१ |
| | **एकुण** | —— | ०१ | ०३ | —— | —— | ०१ | ०४ | ०१ | १० |

**महाराष्ट्र शासन**

क्र. बृआमा २०१७/प्र.क्र. ३७६/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक – ०८/०९/२०१७.

प्रति,

कुलगुरू/कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय - <u>अकृषी विद्यापीठांचे बृहत आराखडे मंजूर करण्याबाबत.</u>
महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग (MAHED) बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग (MAHED) ची बैठक मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ३१.८.२०१७ रोजी दुपारी ०२.४५ वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल येथे पार पडली. सदरहू बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. तरी त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

( सिध्दार्थ खरात )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे प्रधान सचिव.
२) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव
३) मा. मंत्री, वित्त विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव
४) मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव
५) मा. मंत्री, उद्योग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव
६) मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव
७) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव
८) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग
९) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग
१०) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग
११) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग
१२) अपर मुख्य सचिव, उद्योग विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग
१३) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग

१४) प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.
१५) प्रधान सचिव, नियोजन विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग
१६) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग,
१७) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग
१८) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग
१९) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग
२०) सह सचिव, विद्यापीठ अनुदान आयोगाचे पश्चिम क्षेत्रिय कार्यालय तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग
२१) अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२२) सह सचिव (विशि) यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

## महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग (MAHED)
## बैठकीचे इतिवृत्त

दि.३१.८.२०१७ रोजी दुपारी ०२.४५ वा.सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल येथे मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या "अकृषी विद्यापीठांचे वार्षिक बृहत आराखडे मंजूर करण्याबाबत" निर्णय घेण्यासंदर्भात बैठक पार पडली.

सदर बैठकीसाठी खालील मान्यवर उपस्थित होते.

१.मा.श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.

२.मा.श्री. विनोद तावडे, मंत्री तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.

३.मा.श्री.रविंद्र वायकर, राज्यमंत्री तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.

४.मा.सीताराम कुंटे, अपर मुख्य सचिव तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.

५.मा.श्री.आर.ए.राजीव, प्र.स. (वित्त) तथा सदस्य,महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.

६.मा.श्री.असीम गुप्ता,,प्र.स. (कौशल्य) तथा सदस्य,महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.

७.डॉ.धनराज माने, संचालक तथा सदस्य,महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.

८.डॉ.सुवर्णा सि.खरात, सह सचिव तथा(मा.प्र.स.शा.शि. यांचे प्रतिनिधी) सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग.

मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून बैठकीचे प्रयोजन विषद केले. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०७ नुसार अकृषी विद्यापीठांनी सर्वसमावेशक पंचवार्षिक बृहत आराखडे (सम्यक योजना) तयार करून त्यास महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची मान्यता घेण्याबाबतची तरतूद आहे. त्यानुसार मुंबई विद्यापीठ वगळता राज्यातील १० अकृषी विद्यापीठांनी सादर केलेल्या बृहत आराखड्यासंदर्भात महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (MAHED) बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. अकृषी विद्यापीठांनी ( मुंबई विद्यापीठ वगळून) सादर केलेले बृहत आराखडे (सम्यक योजना) यांना मान्यता देण्यात आली.

मात्र विद्यापीठांनी तयार केलेल्या बृहत आराखडयातील बिंदू इत्यादींची सखोल छाननी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडून (MAHED) तज्ञांची समिती नियुक्त करण्यात यावी. तज्ञ समितीच्या अहवालासह बृहत आराखड्यांचा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (MAHED) पुढील बैठकीत विचारविनियम करुनबृहत आराखड्यामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यात यावी.

२. दरम्यानच्या काळात विद्यापीठाने तयार केलेल्या बृहत आराखडयानुसार सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता स्थानिक गरजा, निकड इत्यादी लक्षात घेऊन विद्यापीठानी जाहिरात देऊन ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत अर्ज मागवावेत.तथापि जाहिरातीमध्ये तज्ञ समितीच्या शिफारशी तसेच माहेडच्या अंतिम मंजुरीस अधीन राहून पात्र अर्जांचा विचार केला जाईल अशी अट नमूद करावी.

३. कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) कायदा, १९९७ नुसार बृहत आराखड्यानुसार निश्चित केलेल्या बिंदूकरिता अर्ज मागविण्याचा अंतिम दिनांक ऑक्टोबर असा आहे. त्यानुसार विद्यापीठाने जाहिरात देऊन अर्ज मागवावेत.

४. महाराष्ट्र राज्य सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १०७ अन्वये बृहत आराखड्यांना अधिसभेची मान्यता आवश्यक आहे. तथापि, काही विद्यापीठांनी अधिसभेची मान्यता घेतली नसल्याचे दिसून येते. त्यांनी जाहिरात काढण्यापूर्वी अधिसभेची मान्यता घ्यावी.

५. मुंबई विद्यापीठाने अद्यापपर्यंत बृहत आराखडा सादर केला नसल्याची नोंद (MAHED) महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाने घेतली.

६. सॅटेलाईट सेंटरबाबतचे धोरण अंतिम न झाल्यामुळे सॅटेलाईट सेंटरला सन २०१८-१९ या वर्षामध्ये मान्यता देण्यात येऊ नये, धोरण अंतिम झाल्यानंतर त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

मा.अप्पर मुख्य सचिव (उ.व तं.शि.) यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करून बैठक समाप्त झाली.

------xxxxxx------

**महाराष्ट्र शासन**

ई-मेलद्वारे

क्र. बृआमा २०१७/प्र.क्र. ३७६/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक — ११/०९/२०१७.

प्रति,
कुलगुरू/कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय - अकृषी विद्यापीठांचे बृहत आराखडे मंजूर करण्याबाबत.
संदर्भ - शासनाचे समक्रमांकाचे दि. ०८/०९/२०१७ चे पत्र.

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रान्वये महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (MAHED), मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ३१/०८/२०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तांत नमूद केल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्याबाबत आपणास कळविण्यात आलेले आहे.

सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अकृषी विद्यापीठांनी तयार केलेल्या बृहत आराखडयातील बिंदू इत्यादींची सखोल छाननी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडून (MAHED) तज्ञांची समिती नियुक्त करण्यात येणार आहे. तज्ञ समितीच्या अहवालासह बृहत आराखड्यांचा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (MAHED) पुढील बैठकीत विचारविनियम करुन बृहत आराखड्यामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यात यावी, असा निर्णय महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यानुसार खालील मुद्यांच्या अनुषंगाने आपण त्वरीत कार्यवाही करावी.

१. विद्यापीठाने तयार केलेल्या व महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाने मंजूरी दिलेल्या बृहत आराखडयानुसार सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता स्थानिक गरजा, निकड इत्यादी लक्षात घेऊन विद्यापीठानी जाहिरात देऊन ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत अर्ज मागवावेत.तथापि जाहिरातीमध्ये तज्ञ समितीच्या शिफारशी तसेच माहेडच्या अंतिम मंजुरीस अधीन राहून पात्र अर्जांचा विचार केला जाईल अशी अट नमूद करावी.

२. कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) कायदा, १९९७ नुसार बृहत आराखड्यानुसार निश्चित केलेल्या बिंदूकरिता अर्ज मागविण्याचा अंतिम दिनांक ऑक्टोबर असा आहे. त्यानुसार विद्यापीठाने जाहिरात देऊन अर्ज मागवावेत.

३. महाराष्ट्र राज्य सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १०७ अन्वये बृहत आराखड्यांना अधिसभेची मान्यता आवश्यक आहे. तथापि, काही विद्यापीठांनी अधिसभेची मान्यता घेतली नसल्याचे दिसून येते. त्यांनी जाहिरात काढण्यापूर्वी अधिसभेची मान्यता घ्यावी.

४. सॅटेलाईट सेंटरबाबतचे धोरण अंतिम न झाल्यामुळे सॅटेलाईट सेंटरला सन २०१८-१९ या वर्षामध्ये मान्यता देण्यात येऊ नये असा निर्णय बैठकीत झाला असल्यामुळे त्याबाबतचे धोरण अंतिम झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी.

( सिध्दार्थ खरात )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

१) कुलगुरु/कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
२) संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
३) संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई.
४) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी.